**<u>ठळक बातम्या</u>**

- भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन

- पुन्हा सत्तेत आल्यानंतर संविधान किंवा आरक्षण हटवणार नसल्याचा ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांचा भंडाऱ्यात पुनरुच्चार

- धैर्यशील मोहिते-पाटील यांचा शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश, माढ्यातून लोकसभेसाठी मंगळवारी अर्ज भरणार

**आणि**

- अवकाळी पावसामुळं साडे ७ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरच्या पीकांचं नुकसान झाल्याचा अंदाज

**<><><><><>**

मुंबईत राज्यपाल रमेश बैस यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादरच्या चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. त्यावेळी मुंबई महानगर पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, शहर जिल्हाधिकारी संजय यादव उपस्थित होते. यावेळी हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. चैत्यभूमी परिसरात मतदार जनजागृतीसाठी विशेष स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाला राज्यपालांनी भेट दिली आणि मतदानाचा हक्क बजावण्याचं आवाहन केलं.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही चैत्यभूमीवर जाऊन बाबासाहेबांना अभिवादन केलं. चैत्यभूमीच्या आवारात भरवलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. बाबासाहेबांनी तयार केलेल्या संविधानाला अनुसरून राज्याचा कारभार सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><>**

नागपुरमध्ये दीक्षाभूमी इथं डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी बाबासाहेबांच्या अस्थिकलशाचं दर्शन घेत त्यांना आदरांजली वाहिली.

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनीही दीक्षाभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. बाबासाहेबांनी कायमच स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा पुरस्कार केला, ते समाजसुधारणेचे अग्रणी होते अशा शब्दांत त्यांनी बाबासाहेब यांना आदरांजली वाहिली आहे.

कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष **मल्लिकार्जुन खर्गे** यांनीही आज दीक्षाभूमी इथं जाऊन बाबासाहेबांना आदरांजली वाहिली. आंबेडकर यांनी रचलेल्या संविधानामुळे सामान्य नागरिकाला आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळेल, असं प्रतिपादन त्यांनी केलं.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शेजारी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. बाबासाहेबांनी समाजानं दूर सारलेल्या घटकांना सन्मानाची वागणूक देत त्यांच्यात स्वाभिमान जागृत केला असं पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

राज्यात सर्वत्र भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम झाले. त्याचा थोडक्यात आढावा आता घेऊया.

**होल्ड**

रत्नागिरी जिल्ह्याच्या मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या त्यांच्या मूळ गावी जिल्हा प्रशासन आणि सामाजिक न्याय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. बाबासाहेबांच्या प्रतिमेचं पूजन, मिरवणूक, शाहिरी आणि गीत गायनाचा कार्यक्रम या वेळी झाला.

नागपूरातल्या संविधान चौकात काल रात्री १२ वाजता हजारो बौद्ध अनुयायांनी एकत्र येत बाबासाहेबांना अभिवादन केलं. **नाशिकमध्येही** रात्री १२ वाजता शालीमार आणि नाशिकरोड इथल्या बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली** इथं आज केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**अकोल्यात** अशोक वाटिका इथं बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला प्रकाश आंबेडकर यांनी पुष्पहार वाहून अभिवादन केलं.

**नांदेडच्या** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातही आंबेडकर जयंती साजरी झाली. भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलातर्फे बाबासाहेबांना मानवंदना देण्यात आली.

**वर्धा** इथल्या महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात आंबेडकर जयंतीच्या निमित्तानं ‘डॉ बाबासाहेब भीमराव रामजी आंबेडकर यांचे विचार’ या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र झालं.

**धुळे, परभणी**, **धाराशिव, रत्नागिरी** इथं जिल्हाधिकाऱ्यांनी बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**बीड, सोलापूर, पालघर, बुलडाणा जिल्ह्यातही** आंबेडकर जयंती निमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन झालं.

**<><><><><>**

पुन्हा सत्तेत आल्यानंतर संविधान किंवा आरक्षण हटवणार नसल्याचा पुनरुच्चार केंद्रीय मंत्री आणि ज्येष्ठ भाजपा नेते अमित शहा यांनी केला. भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनील मेंढे यांच्या भंडारा जिल्ह्यातल्या साकोलीतल्या प्रचारसभेत ते बोलत होते. १९५२ आणि १९५४ च्या निवडणुकीत बाबासाहेब आंबेडकर यांना पराभूत करण्यासाठी काँग्रेसनं प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी केला.

पुन्हा सत्तेत आल्यानंतर छत्तीसगडलाही नक्षलवादीमुक्त करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे पक्ष आम्ही नव्हे तर मुलीनं आणि मुलानं तोडल्याचा आरोप त्यांनी केला. विकासाची गंगा अविरत सुरु ठेवण्यासाठी भाजपच्या उमेदवाराला विजयी करण्याचं आवाहन शहा यांनी उपस्थित नागरिकांना केलं. महायुतीचं इंजिन नरेंद्र मोदी आहेत. सुनील मेंढे यांना दिलेलं मत नरेंद्र मोदी यांना मिळेल, असं भाजपा नेते देवेंद्र फडवणीस या सभेत म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस फार आधीपासून भाजपासोबत हातमिळवणी करण्याच्या प्रयत्नात होती. वरिष्ठांच्या आदेशावरुन आम्ही भाजपाशी चर्चेचा प्रयत्न केला होता, असा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी केला.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून माढा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते-पाटील मंगळवारी लोकसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

आज त्यांनी शरद पवार यांच्या पक्षात अधिकृतरित्या प्रवेश केला. सर्वांच्या इच्छेनुसार ते उमेदवारी करत असल्यानं त्यांच्यासह सोलापुर लोकसभा मतदारसंघातही महाविकास आघाडीचा उमेदवार जिंकून येईल अशा विश्वास शरद पवार यांनी आज अकलूजमध्ये व्यक्त केला. महाविकास आघाडीला डाव्या पक्षांनीही पाठिंबा दिल्यानं गेल्यावेळेपेक्षा जास्त जागा यावेळी निवडून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, शेकापचे जयंत पाटील, अनिकेत देशमुख यांच्यासह विविध नेते उपस्थित होते. या बैठकीला आमदार रणजितसिंह मोहिते पाटील शेजारी अनुपस्थित असले तरी त्यांचे चिरंजीव शिवराज सिंह मोहिते पाटील हे मात्र उपस्थित आहेत.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी ७५ टक्के पेक्षा अधिक होईल यासाठी प्रयत्न करावेत, असं आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी केलं आहे. सोलापूर इथल्या नियोजन भवनाच्या सभागृहात आयोजित लोकसभा निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते.

सांगलीमध्ये निवडणूक विषयक कामाचा त्यांनी आढावा घेतला.

**<><><><><>**

सलग सहाव्या दिवशी राज्यात अवकाळी पाऊस झाला. विदर्भात मंगळवार ते गुरुवार या तीन दिवसांत तब्बल साडेसात हजार हेक्टरवर पिकांचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला.

सर्वाधिक चार हजार हेक्टरवरील पिकांचं नुकसान जळगाव जिल्ह्यात झाल्याचा अंदाज आहे. आजही विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. आज पहाटेही मराठवाडा, विदर्भासह जळगाव आणि सोलापूर जिल्ह्यात पाऊस झाला.

<><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात दिवसेंदिवस उष्णतेचं प्रमाण वाढत असल्यानं पारा ४२ अंशावर गेला आहे. त्यामुळे जिल्हाभरात एकूण १२रुग्ण उष्माघाताचे रुग्ण आढळले आहेत. उष्माघात बाधितांसाठी उपजिल्हा रुग्णालयात विशेष कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

<><><><><>

अभिनेता सलमान खान याच्या वांद्रे इथल्या निवासस्थानाबाहेर आज पहाटे पाच वाजण्याच्या सुमाराला गोळीबार झाल्याचं वृत्त आहे. दोन अज्ञात व्यक्ती अंदाधुंद गोळीबार करून फरार झाल्या, मात्र या प्रकरणात अद्याप कोणालाही ताब्यात घेतलं नसल्याची माहिती गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सलमान खान याच्यासोबत दूरध्वनीवरून चर्चा केली आणि सुरक्षिततेबाबत आश्वस्त केलं.

<><><><><>

चंद्रपूर जिल्ह्यातल्या भद्रावती तालुक्यात माजरी इथं एका धार्मिक कार्यक्रमानंतरच्या महाप्रसादातून १०० भाविकांना विषबाधा झाली

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता इथं झालेल्या सामन्यात कोलकता नाईट रायडर्सनं लखनऊ सुपर जाएंट्सवर ८ गडी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना लखनऊनं कोलकतासमोर विजयासाठी १६१ धावा केल्या. लखनऊच्या वतीनं निकोलस पुरण यानं सर्वाधिक ४५ धावा केल्या. विजयासाठी १६२ धावांचं आव्हान १५ षटकं आणि ४ चेंडूत केवळ २ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. कोलकत्याच्या वतीनं फिलीप सॉल्ट यानं सर्वाधिक ८९ धावा केल्या.

स्पर्धेत थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता मुंबई इंडिअन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज्स यांच्यात सामना होणार आहे. या सामन्यात मुंबईनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//